भारतीय जनता पार्टी

**प्रसिद्धी पत्रक** **१८ डिसेंबर २०१०**

**भाजप नेता वेंकय्या नायडू यांनी डॉ. किरीट सोमय्यांची १० पानी पुस्तिका '२०१० दि इयर ऑफ स्कॅम्स' प्रकाशित केली**

**'२०१० दि इयर ऑफ स्कॅम्स' (सारांश)**

वर्ष २०१० हे भारताने आतापर्यंत पाहिलेले सर्वात वाईट वर्ष म्हणून गणले जाईल. हे घोटाळे आणि स्कॅम्सचे वर्ष आहे. काँग्रेसच्या नेतृत्वाखालील युपीए२ एक असे सरकार आहे ज्याने भ्रष्टचाराला प्रोत्साहन दिले आणि प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. सीडब्ल्यूजी स्कॅम रु. ७०,००० कोटींचे आहे आणि ते वाढतेच आहे. २ जी स्कॅम रु. १७६०००००००० म्हणजे रु. १७६,००० कोटींचे आहे.

गेल्या काही महिन्यात स्कॅम्सचा वर्षाव होत आहे त्यामुळे भारतीय जनता चक्रावली आहे. केंद्रात काँग्रेसच्या नेतृत्वाखाली एक मजबूत सरकार निवडून दिल्यानंतर सामान्य माणसाची अपेक्षा कि होती काँग्रेसच्या, सोनिया गांधी आणि डॉ. मनमोहन सिंग यांच्या नेतृत्वाखाली, एक स्वच्छ आणि स्थिर सरकार मिळेल.

भारतीय जनतेने विविध स्कॅम्स पाहिली आहेत पण सध्याच्या स्कॅम-घोटाळ्यांनी रु. ७४ कोटींच्या बोफोर्स घोटाळ्याला किंवा हर्षद मेहता आणि केतन मेहतांच्या घोटाळ्यांना पार मागे टाकले आहे.

भारतीय जनतेने प्रथमच सत्ताधारी पक्ष असलेल्या काँग्रेस-युपीएने केवळ १० दिवसांच्या कालावधीत(नोव्हेंबर २०१०) आपल्या तीन नेत्यांना/मंत्र्यांना राजीनामा देण्यास भाग पाडले आहे.

१) श्री. अशोक चव्हाण, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, यांना आदर्श सोसायटी स्कॅमपायी हटविण्यात आले. मुख्यमंत्र्यांनी स्वतःला दक्षिण मुंबईतील या आलिशान सोसायटीत स्वतःच्या सगेसोयऱ्यांच्या नावे ४ फ्लॅटस् मिळवले आहेत. ही हाउसिंग सोसायटी कारगील युद्धातील वीर/हुतात्म्यांसाठी होती.

- या स्कॅममध्ये कांग्रेसचे ४ मुख्यमंत्री सामील आहेत- श्री. नारायण राणे, श्री. विलासराव देशमुख, श्री. सुशीलकुमार शिंदे आणि श्री. अशोक चव्हाण.

२) श्री. सुरेश कलमाडी, कॉमनवेल्थ गेम्सच्या संघटक समितीचे अध्यक्ष, यांना कांग्रेस संसदीय पक्षाच्या सचिव पदावरून काढून टाकण्यात आले.

३) श्री. ए. राजा यांना २जी टेलिकॉम स्कॅममुळे राजीनामा देण्यास भाग पडले.

**२०१०- घोटाळ्यांचे वर्ष**

- **२जी स्पेक्ट्रम घोटाळा**
- **कॉमनवेल्थ गेम्स**
- **आदर्श सोसायटी**

- **सडलेले धान्य**
- **फुड इनफ्लेशन-महागाईचा महाघोटाळा**
- **तांदूळ निर्यात घोटाळा**
- **महान भारतीय सार्वजनिक वितरण व्यवस्था घोटाळा**
- **मुख्य सतर्कता आयुक्तांच्या नियुक्तीचा घोटाळा**
- **आयपीएल- कोची फ्रँचायसी घोटाळा**
- **आयुर्विमा हाउसिंग स्कॅम**
- **सत्यम स्कॅम**
- २जी टेलिकॉम स्कॅमः सीएजी अहवालात उघड करण्यात आले आहे कि रु. १,७६,३७९ कोटींचा सरकारी महसूल बुडाला.
- सीडब्ल्यूजी स्कॅम रु. ७०,००० कोटींचा. जवाहरलाल नेहरू स्टेडियमच्या नूतनीकरणाचा खर्च, नागपूर येथील नीवन स्टेडियमच्या रु. ८४ कोटींच्या तुलनेत रु. ९६१ कोटी एवढा प्रचंड होता!
- महागाई- महागोटाळा – धान्याचे प्रचंड उत्पादन होऊनही, गोदामे धान्याने शीगोशीग भरलेली असतानाही जीवनावश्यक वस्तूंच्या किंमती २००९ मध्ये काँग्रेस सरकार पुन्हा सत्तेवर आल्यानंतर ५०% ते १००% नी वाढल्या. बटाट्याचा भाव रु.६/रु.८ किलो होता तो रु. १५ किलोपर्यंत गेला आहे. कांद्याचा भाव रु. ६ किलोवरून रु. ३० पर्यंत गेला आहे, लसूण जी २००८-०९ मध्ये केवळ २० रु. किलोने मिळत होती ती आता ३०० रु. किलो झाली आहे. गेल्या एका वर्षात पेट्रोलच्या किंमती ३३% नी वर गेल्या आहेत.
- न्यायालयांनी सर्वजनिक वितरण व्यवस्था/शिधा योजनेवर ताशेर ओढले आहेत. गरिबांसाठी असलेले हजारो कोटी रुपयांचे धान्य काळ्या बाजारात पोचले. त्यासाठी अरुणाचल प्रदेशच्या माजी काँग्रेसी मुख्यमंत्र्यांना अटक झाली आहे.
- नॉन-बासमती तांदूळाच्या निर्यातीच्या रु. २५०० कोटींच्या स्कॅममधील अक्षम्य त्रुटी आता सरकारने मान्य केल्या आहेत.
- **या सर्व महत्त्वाच्या निर्णयात मंत्रीमंडळ सहभागी आहे. मंत्र्यांच्या गटाने सीडब्ल्यूजी आणि वाढवलेल्या खर्चाची ४८ वेळा चर्चा केली आहे. पंतप्रधान, पंतप्रधान कार्यालय आणि मंत्रीमंडळाने अनेक वेळा २जी टेलिकॉम, महागाई आणि सडक्या धान्यावर चर्चा केली आहे.**
- ***या बाबतीत पंतप्रधान आणि कांग्रेस नेतृत्व जनतेला उत्तरदायी आहे.***

**किरीट सोमय्या**

भाजप राष्ट्रीय सचिव